# श्रीकृष्णाच्या गोष्टी



BVBK-0402816

# भगवान श्रीकृष्णाच्या गोष्टी



BVBK-0402816

लेखक : श्री. रं. म. जोशी-
निर्मळ गुरुजी

किंमत ४ रुपये

मे. शारदा साहित्य, पुणे - २.

मे. सरस्वती ग्रंथ भांडार
अप्पा बळवंत चौक, पुणे २.
फोन : ४३१२११

मे. सरस्वती बुक डेपो
नवी पेठ, सोलापूर
फोन : २६६३०

## ** अनुक्रमणिका **

१. देवकीचा बाळ
२. यशोदेचा कृष्ण
३. गोपालकृष्ण
४. गोकुळी राहावे, की जावे?
५. तू माझी आई----
६. मनमोहन मुरलीधर
७. संकटहारी-गिरिधारी
८. कंसाचा काळ !
९. द्वारकाधीश श्रीकृष्ण
१०. कृष्णसखा सुदामा
११. पांडवांचा कैवारी
१२. भगवान श्रीकृष्ण

आदौ देवकिदेवगर्भजननं गोपीगृहेवर्धनम् ।
मायापूतनजीवितापहरणं गोवर्धनोद्धारणम् ।।
कंसच्छेदनकौरवादि हननं कुंतीसुत: पालनम् ।
एतद् भागवत पुराण कथितं श्रीकृष्णलीलामृतम् ।।१।।

प्रकाशक : रमेश य. कुंदूर
मे.शारदा साहित्य, २८-अ. बुधवार पेठ. पुणे - २.
मुद्रक : श्रीराम ऑफसेट, सर्व्हे नं. १४/२३, 'गायत्री', धायरी.
सुमंगल मुद्रणालय, १३५ नारायण .
© सर्व हक्क प्रकाशकाकडे

# १. देवकीचा बाळ

श्रावण महिना. पौर्णिमेनंतरचा आठवा दिवस. कृष्ण अष्टमी. मध्यरात्रीची वेळ. मथुरानगरीच्या तुरुंगात देवकीला बाळ झाला. तिचा पती वसुदेव घाबरून तिला म्हणाला, "कंसराजा येईल. या बाळाला मारून टाकील. आपला हा आठवा बाळ. याला तरी वाचवलंच पाहिजे !"

"मग आता काय करायचं?"

दोघांनी विचार केला,पटकन् त्या बाळाला घेतलं. एका टोपलीत घातलं आणि वसुदेव त्या बाळाला घेऊन तुरुंगाबाहेर पडला. त्यावेळी तेथील सारे पहारेकरी गाढ झोपलेले होते.

काळाकुट्ट अंधार. पाऊस धो धो कोसळत होता. वसुदेव यमुना नदीवर गेला. पाण्यातून पलीकडे गोकुळात जायचं. वसुदेव नदीत शिरला. यमुनेला तेवढ्यात पूर आला. वसुदेवानं टोपली डोक्यावर घेतली. पाणी वरवर चढू लागलं. अचानक बाळाचा एक पाय टोपलीबाहेर आला. बाळाचा पाय पाण्याला लागला मात्र, पाणी सर्र्कन् उतरलं! नदीतून वसुदेवास वाट मिळाली. वसुदेव गोकुळनगरीत गेला.

गवळ्याचा राजा नंद. त्याची राणी यशोदा. ती पलंगावर शांत झोपली होती. तिच्यापुढे तान्हे बाळ होते. वसुदेव हळूच यशोदेजवळ गेला. त्याने टोपलीतलं आपलं बाळ यशोदेपुढे ठेवलं. यशोदेपुढील तान्हे बाळ त्याने

उचलले. ते बाळ टोपलीत घेतले अन् आल्यावाटेनं तो झटकन् परतला. त्याने ते तान्हे बाळ देवकीपुढे ठेवले. सारी हकीगत तिला सांगितली.

मथुरेच्या तुरुंगात तान्हे बाळ टँहँऽ टँहँऽ करून रडू लागले. पहारेकरी जागे झाले. कंस राजाला वार्ता कळली. तो धावत धावत तुरुंगात आला. त्याने देवकीपुढील ते तान्हे बाळ हिसकावून घेतले.

" हाच तो देवकीचा आठवा बाळ! माझा काळ! आता याला शिळेवर आपटून मी मारून टाकतो ! हाः हाः हाः" असे म्हणून कंसाने त्या बाळाच्या तंगड्या धरल्या आणि गरगर फिरवून त्याला शिळेवर आपटणार, तोच काय चमत्कार!

कंसाच्या हातून ते बाळ निसटले आणि थेट आकाशा-



कडे झेपावले. चमकन् वीज चमकली. आकाशातून ते बाळ

म्हणाले, "मी महामाया आहे, मला मारणारा तू रे कोण? अरे दुष्टा, राक्षसा, तुझी चुलत बहीण देवकी. तिची सात बाळे तू मारलीस;पण तिचा आठवा बाळ तुझ्या हाती लागला नाही. तो तुझा वैरी गोकुळात वाढणार आहे! सावध रहाऽऽऽ "

आ ऽ करून कंसाने आकाशाकडे पाहिले. ते शब्द त्याच्या कानांत घुमू लागले. तो संतापाने ओरडू लागला- "देवकीचा बाळ ऽऽ माझा काळ ऽऽ तो गोकुळात वाढत आहे ऽऽ? त्याला मी ठार मारणार !" कंस राजा दणदण पाय आपटीत तेथून निघून गेला.

त्याच तुरुंगात कंसाचे वडील उग्रसेन महाराज होते. त्यांनी कंसाचे ते ओरडणे ऐकले. ते आनंदाने म्हणाले, "मला तुरुंगात टाकून कंसाने राजगादी मिळविली. या अशा दुष्ट पुत्राला देव शिक्षा करणारच. देवकीचा तो आठवा बाळ, कंसाचा काळ आहे. तो कंसाला मारणार हे विधिलिखित आहे. वाहवा! छान झालं!- देवकीचा बाळ कंसाच्या हातून निसटून गेला, छान झालं !"

मग कंसाने वसुदेव-देवकीचा पहारा खूपच कडक केला. त्याने आपल्या वडिलांचा— उग्रसेन महाराजांचा सुद्धा खूप छळ केला. आणि गोकुळनगरीत गेलेला देवकीचा बाळ, आपला काळ, त्याचा शोध करून त्याला ठार मारण्याच्या उद्योगाला लागला.

★★

# २ .यशोदेचा कृष्ण

भल्या पहाटेस यशोदेला जाग आली. पाहाते तर काय! तिच्यापुढे तान्हे बाळ. "अग बाई मुलगा ! तो टँहँ टँहँ करू लागला. दासी धावल्या. "यशोदेला मुलगा झाला ऽ यशोदेला मुलगा झाला ऽऽ!" गोकुळात वार्ता पसरली.

नंदराजाच्या दारात गौळणींनी हेल घातले.'दूधऽदूध नंदाच्या दारात दूधगंगा आली.' गल्लीगल्लींत गुलाल उधळला. गोप-गोपी टिपऱ्या खेळू लागल्या. यमुना नदी दुथडी भरून वाहू लागली. नंदाच्या घरी पाळणा हलला.

बारशाचा थाट काय सांगावा. यशोदेचा बाळ---- रंगानं काळासावळा, घनश्याम, बाळाचं नाव ठेवलं कृष्ण! कृष्णाला सजवलं, पाळण्यात घातलं. गौळणी गाऊ लागल्या. कुणी गोविंद घ्या ग, कोणी गोपाळ घ्या! नंदाचा बाई हा आनंद घ्या!"

जी ती गौळण कृष्णाला मांडीवर घ्यायची. त्याचे कान फुंकून हर्रर्र- कुर्रर्र करायची. हातावर त्याला झुलवायची. तेवढ्यात एक जाडजूड नवीनच बाई आली. गौळण नव्हती ती. गर्दीत घुसून कृष्णाला तिनं मांडीवर घेतलं. त्याच्यावर आपला पदर झाकला, आणि----- बाळकृष्णाचं नरडं दाबायला सुरुवात केली. वाहवा रे बाई! मग कृष्णानं त्या बाईला जोराची लाथ मारली. त्या खूप जोराच्या दणक्यानं ती बाई धाडकन् जमिनीवर पडली.

कृष्ण तिच्या छातीवर जोरजोरानं मारू लागला.

तिच्या तोंडातून रक्त आलं. तिनं खूप मोठ्ठं रूप घेतलं. किंचाळत ती ओरडली, " कृष्णा, मला सोड, कृष्णा ऽऽ मी राक्षशिण आहे. मी कंसाची बहीण पुतना! ह्या तुझ्या पुतना मावशीला सोड. कंसाच्या सांगण्यावरून मी तुला मारायला आले होते; पण तूच मला मारणार आहेस हे मला आता पटलं.

मग कृष्णानं तिला सोडलं. ती धडपडून उठली आणि मथुरेला धावत–पळत निघून गेली. साऱ्या गौळणी चकित झाल्या. यशोदेनं कृष्णाला पदराखाली घेतलं !

यशोदेचा कृष्ण हळूहळू वाढू लागला.

गोकुळातल्या गौळणी कृष्णाचं भारी कौतुक करीत होत्या. बाळ कृष्ण रांगू लागला. बोबडं बोलू लागला. दुडूदुडू धावू लागला. खोड्या करू लागला. हट्ट करू लागला.

यशोदा आपल्या बाळकृष्णाला भारी जपायची, त्याला मोरपंखांनी सजवायची.

तिकडे पुतना मावशी मथुरेत गेली.गोकुळातली आपली फजिती तिने कंसाला कथन केली. कंस म्हणाला, "माझा डाव फसला. गोकुळच्या नारी सावध झाल्या. आता कृष्णाला ते सारेजण जपतील! आता काही दिवसांनी दुसरा डाव टाकीन.त्या माझ्या वैऱ्याला मारल्याशिवाय मला चैन पडणार नाही!

आणि खरंच पुतनामावशी पळून गेल्यानंतर गोकुळच्या गौळणी कृष्णाला फारच जपू लागल्या. यशोदामाई तर आपल्या बाळकृष्णाला कोणत्याही बाईजवळ देत नसे. फक्त एकटी राधा गवळण मात्र यशोदेच्या घरी सतत राहायची.

तीच त्या कृष्णाला खेळवायची.

राधेला कृष्णाचं एवढं वेड लागलं की, ती सतत 'कृष्ण कृष्ण' असेच म्हणत राही. राधा गवळण ताक घुसळायची तर तिच्या काकणांतूनही 'कृष्ण कृष्ण' असाच आवाज निघायचा. घरचा कामधंदा सोडून ती नेहमी नंदाच्या घरी कृष्णाच्या शेजारी राहायची. राधेचा नवरा अनया यालासुद्धा राधेचे ते कृष्णवेड आवडायचे. तो म्हणायचा, "कृष्ण हा देवच आहे. माझी राधा त्याची सेवा करते हे मोठे पुण्यच आहे."

कृष्ण आता मोठा झाला. त्याला बाहेरचे सोबती मिळाले. घर सोडून कृष्ण आता त्या सोबत्यांत रमू लागला.

**

## ३. गोपालकृष्ण !

गोकुळ आणि वृंदावन ही गावे यमुनाकाठी अगदी जवळजवळ होती. त्या दोन्ही गावांत गवळ्यांची खूप मोठी वस्ती होती. गाईगुरांची खिल्लारे आणि दूधदुभत्याचा धंदा. गोकुळचे दूध मथुरेला जायचे. गौळणी बाजारहाट करायच्या. यमुनेच्या घाटावर गौळणींची गर्दी व्हायची. त्यांची मुले यमुनाकाठी खेळायची.

यशोदेचा कृष्ण राधेबरोबर यमुनेवर जायचा. पेंद्या, वैज्या, वाकड्या, तोतऱ्या, बोबड्या, असे खूप सोबती कृष्णाला मिळाले. ते यमुनाकाठी खेळत. विटीदांडू, लगोऱ्या, शिवणापाणी, लपाछपी, चेंडूफळी, हमामा, असे

कितीतरी खेळ खेळत. यमुनेच्या पाण्यात डुंबत. मग खूप दमल्या-थकल्यावर घरी जात व भरपूर दूध पीत असत.

कृष्णाचा एक थोरला सावत्र भाऊ बलराम-वसुदेवाचा मुलगा, हाही गोकुळातच वाढत होता. कृष्णाच्या सोबत्यांबरोबर तोही येऊन खेळायचा. यशोदेचे बलरामावरही खूप प्रेम होते. ती राम-कृष्णांची भावाभावांची जोडी सोबत्यांना खूप आवडायची. कृष्ण आणि त्याचे सवंगडी गोकुळात खूप धिंगाणा करायचे.

एकदा यशोदा म्हणाली, " कृष्णा, तू आता मोठा झालास. नुसत्या खेळात, हुंदडण्यात वेळ घालविण्यापेक्षा गाई-गुरे घेऊन रानात जात जा! काम कर, तू गवळ्याचा पोर, गाईगुरांची सेवा कर!"

मग गाईगुरे घेऊन कृष्ण रानात जाऊ लागला बलराम आणि कृष्णाचे सारे सोबतीही गाईगुरे घेऊन रानात जाऊ लागले. दुपारच्या वेळी शिदोऱ्या सोडून यमुनातीरी सावलीत अंगत-पंगत करू लागले.

वृंदावनाच्या कुंजवनात गाईगुरे चरायची. कृष्ण आणि त्याचे सोबती फुलपाखराबरोबर धावायचे. आंधळी कोशिंबिर खेळायचे. डोक्यावर मोरपंख लावायचे. कृष्ण बासरी वाजवायचा. त्याच्याभोवती सारे गोपाळ फेर धरून नाचायचे. संध्याकाळी सारेजण घरी परत यायचे.

एकदा अशीच दुपारची वेळ होती.

गाईगुरे रवंथ करीत झाडांच्या सावलीत बसली होती. कृष्ण आणि त्याचे सवंगडी सूरपारंब्यांचा खेळ खेळत होते. तेवढ्यात झाडावरून एक नवखा गडी खाली उतरला. त्या


धिप्पाड गड्याने कृष्णाच्या अंगावर उडी घेतली आणि तो कृष्णाला बगलेत धरून ओढीत नेऊ लागला.

कृष्णाच्या सोबत्यांनी ते पाहिले. मग काय! सारेजण एकदम त्या गड्यावर तुटून पडले. साऱ्यांनी त्याला खूप बदडून काढले. त्याच्या तोंडातून रक्त येऊ लागले. तो कण्हत, विव्हळत हात जोडून म्हणाला, "मला सोडा, मी राक्षस आहे. कंसाच्या सांगण्यावरून मी येथे आलो आहे. गोपाळाचे रूप घेऊन तुमच्यात मिसळलो. मी कृष्णाला मारणार होतो. पण---तुम्ही मला मारू नका, मला सोडा!"

कृष्ण म्हणाला, " जाऊ द्या रे, सोडा त्याला." मग गोपाळांनी त्या राक्षसाला सोडून दिले. तो धावत-पळत मथुरेला गेला. धापा टाकीत त्याने कंसाला आपली फजिती सांगितली. तेव्हा कंस म्हणाला, " असं काय? ठीक आहे!"

मग कंसाने अनेक राक्षस कृष्णावर सोडले. एक राक्षस घोड्याचे रूप घेऊन गेला. त्याला गोपाळांनी पिटाळून रक्तबंबाळ केले. दुसरा राक्षस बैलाचे रूप घेऊन गेला. गोपाळकृष्णाने त्या बैलाशी झुंज घेतली. त्या बैलाची शिंगे धरून कृष्णाने त्याची मान मुरगाळून टाकली. गवळ्याची ती मुले कंसाच्या राक्षसवीरांना भारी पडली. सारे गोपाळ सावध राहून एकजुटीने त्या राक्षसांचा नाश करू लागले.

कंसाचे ते सारे प्रयत्न फसले. तो कृष्णाला मारायला टपला होता. पण गोपाळकृष्णापुढे त्याचे काहीच चालेना. गोपाळकृष्णावर उठलेल्या त्या राक्षसांच्या संकटाची वार्ता गोकुळवृंदावनात पसरली. साऱ्यांनी गोपाळांचे कौतुक केले. नंद-यशोदा कृष्णाला फार जपू लागली. राधागौळण



घाबरली. तिने कृष्णाला मिठी मारली. त्याची दृष्टही काढली.

**

# ४. गोकुळी राहावे, की जावे?

गोपाळकृष्ण आणि त्याचे सोबती रानात गप्पागोष्टी करात हात. पद्या म्हणाला, "कुत्ना, मथुलेतले लाक्सस खूपच मातले आहेत, ते तुला मालायला तपले आहेत. त्यांना वात्तं आपण खूप थक्तिवान आहोत-- "

कृष्ण म्हणाला, "अरे, गोकुळातील दूध पिऊनच त्यांना शक्ती आली आहे. आपल्या गौळणी वेड्या आहेत. आपल्या मुलांना दूध देण्याऐवजी त्या मथुरेत नेऊन त्या

राक्षसांना देतात ." वाकड्या म्हणाला, " आपण असं करू---- गौळणींना वाटेत अडवू. गोकुळातलं दूध मथुरेला जाऊ देणार नाही. आपल्या गाईंचं दूध आपल्यालाच पाहिजे!"

तो विचार साऱ्या गोपाळांना पटला. झाले, लगेच दुसऱ्या दिवशी कृष्ण आणि त्याचे सोबती मथुरेच्या वाटेवर उभे राहिले. दूध घेऊन जाणाऱ्या गवळणींना त्यांनी वाटेत अडविले. गौळणींना त्यांचा खूप राग आला. पण--- त्या पोरांच्या एकीपुढे, हट्टापुढे त्यांचे काय चालणार !

मग घरोघरची मुले आपल्या घरच्या गाईंचे दूध पिऊ लागली. काही गौळणी आपल्या मुलांना दूध देईनात, ते गाऱ्हाणे कृष्णापर्यंत जायचे. मग कृष्ण आणि गोपाल अशा मुलांच्या घरात गुपचूप जायचे आणि तेथील सारे दूध, दही, लोणी चोरून खाऊन फस्त करायचे.

मग काय ! घरोघर दही, दूध, लोण्याच्या चोऱ्या होऊ लागल्या. काही ठिकाणी ते गोकुळचे चोर पकडलेही गेले. काही गोपाळांना मारही खावा लागला. तरीही दही, दूध, लोण्याच्या चोऱ्या थांबेनात.

आपल्या मुलांना मारणाऱ्या गौळणींच्या घरी गोपाळांची टोळी जायची. दुधाच्या घागरी फोडायची दह्याचे माठ फोडायची. शिंके तोडून लोणी खायची. काही गौळणींची फजिती करायची. अशा त्या गौळणी त्रासून गेल्या. त्यांनी कृष्णाबद्दल यशोदेकडे तक्रारी केल्या.

एके दिवशी नंदाच्या वाड्यात गौळणींचा मोठा मेळावा जमला. एकेक गौळण यशोदेला कृष्णाचे गाऱ्हाणे सांगू लागली.

"यशोदे, कृष्णाला सांगावे, गोकुळी राहावे का जावे?"

"या कान्हानं शिंक माझं तोडलं, माझ्या अंगावर दहीदूध सांडलं."

"खडे मारुनी घडे फोडतो, नव्या शालूचा पदर फाडतो!"

"आडवाटेनं मध्येच येतो, पाण्या जाता मला अडवितो."

"ऐन दुपारी यमुना तीरी, खोडी कशी काढली, गं बाई याने करंगळी मोडली!"

" यमुनेच्या पाण्यात आम्ही होतो नाहात, गुपचूप आला हरी, लुगडी नेली गं झाडावरी."

अशा गाऱ्हाण्यांच्या गाण्याचा एकच गलका झाला. यशोदा भांबावून गेली. आऽ करून त्या गौळणींकडे पाहू लागली. तेवढ्यात एक गौळण ओरडत तेथे आली. ती म्हणाली, " धरला, गोकुळीचा चोर मी धरून आणलाय् यशोदे, हा बघ तुझा खोडकर कान्हा! चोरून लोणी खाताना मी त्याला धरून आणला आहे!"

साऱ्या गौळणी तिच्याकडं पाहात होत्या. तेवढ्यात यशोदा तिला म्हणाली, "काय गं, तू माझ्या कान्ह्याला धरून आणलास? अगं माझा कृष्ण तर घरात झोपला आहे. तू त्या मुलाकडं नीट बघ. नीट बघ जरा!"

मग ती गौळण धरून आणलेल्या त्या मुलाकडे निरखून पाहू लागली. आणि झटकन् ओशाळून म्हणाली, "अगंबाई, हा तर माझा मिलिंदा!" ते पाहून साऱ्या गौळणी

फिदीफिदी हसल्या.

यशोदा म्हणाली, "गौळणींनो, माझा कृष्ण भारी खोडकर आहे. मी त्याला शिक्षा करीन. तुम्हाला यापुढं त्याचा त्रास होणार नाही. जा आता आपापल्या घरी! आपण सारे जण याच गोकुळात एकत्र आनंदानं नांदू बरंऽऽ!"

**

## ५. तू माझी आईऽऽ!

"कृष्णा, ऐकलीस ना गौळणींची गाऱ्हाणी? अरे तू अशा खोडया करतोस, दहिदुभत्याच्या चोऱ्या करतोस. हे बरं आहे का रे?" यशोदेने कळवळून विचारले !तेव्हा कृष्ण म्हणाला, " आईऽऽ मी जे करतो ते भल्यासाठी करतो बघ! अगं माझे सोबती- गरीब बिचारे, कोणी अपंग, वाकडया, लंगडया, बोबडया, पेंद्या या मुलांना त्यांच्या आया घरचं दूध देत नाहीत. आम्ही गाई राखतो. त्या गाईचं दूध तर या गौळणी मथुरेला नेऊन राक्षसांना देतात. ते राक्षस माजले आहेत. आम्हांला मारायला टपले आहेत, ते या गौळणींना कळत नाही! आम्ही दहीदूध चोरून खातो, काय वाईट करतो! खाष्ट गौळणींची खोड मोडतो. त्यांच्या खोडया करतो ते काय उगीच का? त्या आपल्या उगीच गाऱ्हाणे करतात आणि मग तुम्ही आम्हांलाच शिक्षा करता."

"अरे, कन्हैया, तू लहानपणी असाच दहीदुधाचा हट्ट घेतला होतास. मी ते दिलं नाही म्हणून तू रागानं आपला ताकाचा डेरा फोडलास. मग मी तुला दाव्यानं उखळीला

बांधलं होतं. ती जड उखळी तू ओढत नेलीस आणि ती बाहेरच्या दोन झाडांना अडकली. ती झाडं तू जोरानं पाडून टाकलीस. दामोदरा, ती झाडं जर तुझ्या अंगावर पडली असती तर-- बाईगऽऽ केवढं संकट टळलं ते! पण आता तू मोठा झालास. पंगू सोबत्यांसाठी का होईना हा असा दहीदुधाचा हट्ट सोडून दे. चोऱ्या आणि बळजबरी हे तुला आता शोभत नाही. खोड्या सोड! आणि यापुढं जर अशी गाऱ्हाणी आली तर मी तुला शिक्षा करीन."

यशोदेने असा दम भरल्यावर कृष्ण गप्प राहिला. मनात म्हणाला, " ठीक आहे, मला एकट्यालाच काय म्हणून शिक्षा! बलराम आहे, पेंद्या-वाकड्या-बोबड्या- किती जणांना तू काठीनं झोडपणार? हातच दुखतील तुझे! मग मी तुझे हात चेपून देईन. सेवा करीन! लाडानं म्हणेन, " माझी यशोदा माई, भारी प्रेमळ आहे बरं ऽऽऽ"

काही दिवसांनी पुन्हा तेच ! आता तर घरचेच गाऱ्हाणे. यशोदेने पहाटेच ताक घुसळून लोणी काढून ठेवले होते. थोड्या वेळानं पाहाते तर ते लोणी कुठं आहे? "अग बाई!" तिने कृष्णाला हाक मारली. कृष्णाचे तोंड लोण्याने बरबटलेले होते. मग तिने दरडावून विचारले, " कृष्णा, तू लोणी खाल्लंस ना!"

"लोणी? कसलं लोणी? मय्या, मी नाही लोणी खाल्लं! कुठं होतं लोणी?" कृष्णानं उलट यशोदेलाच विचारले!

यशोदेनं पुन्हा खडसावून विचारलं, "कृष्णा, तू लोणी खाल्लंस ना?" त्यावर कृष्ण पुन्हा म्हणाला, "मी नाही

लोणी खाल्लं!"

"अस्सं? मग तुझ्या तोंडाला हे लोणी कसं बरबटलेलं?" यशोदेचे ते शब्द ऐकताच कृष्णानं तोंडावरून बोट फिरवलं. त्याच्या बोटाला लोणी लागले. ते दाखवून कृष्ण म्हणाला, "हां हां,हे लोणी? अगं, हे लोणी बलरामानं माझ्या तोंडाला लावलं होतं आणि बरं का, माझे सोबती ना माझे वैरी आहेत. ते असेच कधीकधी स्वत: लोणी खातात आणि थोडसं माझ्या तोंडाला लावतात. जणू काय मीच खाल्लं ते लोणी,असं दाखवून मला मार बसवतात!"

"कृष्णा, तू खोटं बोलतोस. केलेला अपराध लपवतोस. बलराम आणि सोबती यांची नावं सांगतोस ! थांब, आज मी तुला काठीनं झोडपून काढणार!"

यशोदा मातेचा तो रागीट अवतार पाहून कृष्णसुद्धा रागाने म्हणाला, " काठीनं झोडपणार मला? मार आईऽऽ मार! ही घे काठी आणि ही कांबळी सुद्धा घे! सांभाळ हे सारं! यापुढं मी गाई चारायला जाणार नाही! काम करणार नाही. गाई राखणार नाही, दूध, दही, लोणी चाखणार नाही !--- नाहीतरी तू अलीकडं त्या गौळणींची गाऱ्हाणी ऐकून माझा राग रागच करतेस. तू माझी आई नाहीसच."

कृष्णाचे ते शब्द ऐकून यशोदेला भडभडून आले. तिचा राग गेला. तिने झटकन् कृष्णाला पोटाशी धरले. ती मायेने गहिवरून म्हणाली, " नाही! नाही! कृष्णा, तसं नाही रे! अरे मी तुझी आईच आहे आणि तू माझा बाळ आहेस रे! माझा बाळकृष्ण गोपाळकृष्ण भारी गुणाचा आहे !"

# ६. मनमोहन मुरलीधर

संकष्टी चतुर्थीची रात्र. चंद्रोदयाची वेळ. यशोदेने गणपतीची पूजा केली. एकवीस मोदकांचे भरलेले ताट देवापुढे ठेवले. ती कृष्णाला म्हणाली, " गणपतीपुढे उभा राहा. हात जोड. प्रार्थना कर. मला चांगली बुद्धी दे! असं म्हण." कृष्णाने हात जोडले. तो म्हणाला, " देवा, आईला चांगली बुद्धी दे!" यशोदा हसून म्हणाली, "अरे, मला नाही म्हणाले, तुला! तुला चांगली बुद्धी येऊ दे, असं म्हण!"

कृष्ण डोळे झाकून म्हणाला, " गणेशा, तुला चांगली बुद्धी येऊ दे!" मग यशोदा रागावून म्हणाली, " हे बघ कान्हा, वात्रटपणा करू नकोस. गणपती बुद्धिदाता देव आहे. तो सर्वांना चांगली बुद्धी देतो. विद्या देतो--"

"आईग ऽ तो सर्वांना चांगली बुद्धी देतो नाऽऽ मग पुन्हा प्रार्थना कशाला? तो त्याचं काम करणारच की! आपण आपलं काम करावं! आता आरतीऽऽ" श्रीकृष्णानं घाई केली.

"आता आधी मोदकांचा नैवेद्य! मग आरती-- अगबाई, पण पंचारती तर घरातच राहिली की! थांब, कृष्णा, मी तूप घालून निरांजन घेऊन येते. तू डोळे झाकून प्रार्थना कर!" असे म्हणून यशोदा स्वयंपाकघरात गेली.

कृष्णानं ते मोदकांचे भरलेले ताट पाहिले. त्यांच्या तोंडाला पाणी सुटले. तो गणपतीला म्हणाला, " काय हो गणोबा, हे इतके मोदक तुम्ही खाणार का? आधीच तुमचं

हे पोट!--- थांबा, आम्ही थोडा थोडा प्रसाद---"कृष्णाने ताटातील तीनचार मोदक भराभर उचलून आपल्या तोंडात कोंबले.

तेव्हढयात निरांजन घेऊन यशोदा घरातून आली. कृष्णाने डोळे झाकले. हात जोडले आणि तो शांत उभा राहिला. यशोदा नैवेद्य दाखवू लागली तोच तिने त्या ताटात पाहिले " अगऽबाई, कृष्णा, अरे ह्या ताटातले मोदक- ?"

"ताटातले मोदक--- ? हां हां!" कृष्ण भरल्या तोंडानं बोबडे बोलत म्हणाला, "अग आई, तू तिकडं गेलीस तेव्हा ह्या गणपतीचा उंदीर आला. त्यानं काही मोदक पळविले ना ! मी डोळे झाकून ते पाहिलं! काय तो उंदीर---!"

कृष्णाचे ते बोबडे बोल ऐकून यशोदेने त्याच्या तोंडाकडे निरखून पाहिले. हसावे की रागवावे हेच तिला कळेना! ती दरडावून म्हणाली, " आ कर! पाहू दे मला तुझं तोंड."

मग कृष्णाने आपले तोंड पसरले. यशोदेने पाहिले तर



काय आश्चर्य! एकेक मोदक म्हणजे तिला ब्रह्मांडाचा गोल दिसू लागला. ब्रह्मांडातले सारे देव त्या तोंडात तिला दिसले. ती थक्कच झाली.

यशोदेने हात जोडले. ती गणपतीला म्हणाली, "देवा, माझा हा कृष्ण देव- अवतारी पुरुषच आहे. त्याने आज मला विश्वरूप दर्शन दिले आहे ! देवा, तू सुखकर्ता, विघ्नहर्ता, बुद्धिदाता आहेस. माझ्या कृष्णाला जगात नामवंत पुरुषोत्तम कर !"

मग यशोदेने गणपतीची आरती केली. प्रसादाचे मोदक तिने कृष्ण, बलराम आणि त्यांचे सवंगडी सर्वांना दिले. ती कृष्णाला म्हणाली, "बाळा, तू या जगाचा थोर पुरुष होशील." त्यावर कृष्ण म्हणाला, "माझ्यापेक्षाही तू थोर आहेस आई ऽऽऽऽ !"

★★

## ७ संकटहारी-गिरिधारी

दुपारची वेळ. गाईगुरे चरून आली. यमुनेच्या डोहातील पाणी प्याली. झाडाखाली रवंथ करीत बसली. कृष्ण आणि त्याचे गोपाळगडी चेंडूफळीचा खेळ खेळू लागले. कृष्णाने चेंडूला फळीचा असा टोला मारला, की तो चेंडू कळंबाच्या झाडावर जाऊन अडकला.


तिकडे गोपाळांनी गाईगुरांकडे पाहिले तर काय! ती गाईगुरे, वासरे झाडाखाली मरून पडलेली दिसली. "अरेरे कृष्णा, हे काय संकट आले ! गाईगुरे कशाने मेली?" कृष्णाने

डोहाकडे पाहिले तर त्या पाण्यावर विषाचे तवंग उठलेले !

कृष्ण म्हणाला, "गड्यांनो, डोहातील पाण्यात काहीतरी गडबड आहे..!"

कृष्ण कळंबाच्या झाडावर चढला. त्या झाडाची एक फांदी यमुनेच्या त्या डोहावर गेलेली होती. तेथून कृष्णानं तो चेंडू काढला. गोपाळांपुढे तो चेंडू फेकला आणि धाडकन यमुनेच्या डोहात उडी मारली !

" अरेरे ! कृष्ण बुडाला, कृष्ण बुडाला।" एकच आरोळी झाली. गोकुळात वार्ता पसरली. सारेजण यमुना डोहाकडे धावले. यशोदा रडू लागली. राधा धाय मोकलून हाका मारू लागली, " कृष्णाऽऽ कृष्णाऽऽ!"



कृष्णाने डोहात उडी मारली त्या डोहात कालिया नावाचा भयंकर नाग होता. तो विषारी फूत्कार टाकीत

होता. कृष्णाने कालियाची मस्तके तुडविली. तो कालियाचा चेंदामेंदा करू लागला. मग कालिया कृष्णाला शरण आला. तो म्हणाला, "कृष्णा, मला मारू नकोस, मी डोह सोडून निघून जातो." कृष्ण म्हणाला. "ताबडतोब निघून जा!"

मग कालियाने कृष्णाला डोक्यावर घेतले. कृष्ण त्या डोहातून बाहेर आला. कालिया तेथून दूर निघून गेला. कृष्ण सुखरूप बाहेर आला. साऱ्यांना खूप आनंद झाला.

थोड्याच वेळाने धो धो पाऊस आला. " पाऊस पडला. छान झालं. पावसांचा देव इंद्र! त्याची पूजा करू." तेव्हा कृष्ण म्हणाला, " लोकहो, पावसाचा देव आहे आपला गोवर्धन पर्वत! त्या उंच पर्वतावरील गवतामुळे आपली गाईगुरे पोसली जातात. पर्वत आणि झाडे यांच्यामुळे पाऊस पडत असतो. आपण गोवर्धन पर्वताचा उत्सव करू! चला!"

मग साऱ्यांनी आपल्या गाईगुरांना छान सजविले. वाजतगाजत मिरवणुकीने लोक गोवर्धन पर्वताकडे गेले. तेवढ्यात खूप जोराचा पाऊस पडला. धो धो पाऊस कोसळू लागला. गाईगुरे वाहून जाऊ लागली. लोकांची धांदल उडाली. तेव्हा कृष्ण म्हणाला, " घाबरू नका. आपण हा पर्वतच उचलू. त्याच्याखाली आपल्याला निवारा मिळेल!"

कृष्णाने पर्वताखाली हात घातले. हळूहळू तो पर्वत वर उचलला. मग कृष्णाने आपली करंगळी पूर्ण पर्वताखाली घातली. तीवर तो उचलला. गोपाळगड्यांनी आपल्या काठ्यांचे आधार दिले. छत्रीसारखा तो पर्वत उचलला. त्याच्याखाली सर्वांना निवारा मिळाला. पाऊस जोराने कोसळतच होता. पण साऱ्यांना आता आधार

मिळाला होता. सारेजण आनंदाने गर्जना करीत होते.

"संकटहारी – गिरिधारी– कृष्णाने करंगळीवर एवढा हा गोवर्धनगिरी उचलला. सारे संकट टळले !"

**

## ८. कंसाचा काळ

एके दिवशी अक्रूर नावाचा कंसाचा एक दूत मथुरेहून गोकुळवृंदावनात आला. त्याने नंदराजाची भेट घेतली आणि सांगितले, " कृष्णाने गोकुळावरील संकटे दूर केली. त्याच्या पराक्रमाचे कौतुक करण्याचा कंसराजाच्या दरबारात एक मोठा समारंभ करायचा आहे. मी कृष्ण आणि बलराम यांना त्या सत्कारासाठी न्यायला आलो आहे !"

कृष्णानेही अक्रूराबरोबर मथुरेला जाण्याची तयारी केली. कृष्ण-बलराम त्याच्या रथात बसले. गोकुळच्या लोकांना खूप वाईट वाटले. साऱ्या गौळणी रथापुढे आडव्या आल्या.त्या रडत रडत म्हणाल्या, "अक्रूर आमचे प्राण घेऊन जात आहे. आम्ही कृष्णाला मथुरेला जाऊ देणार नाही!" कृष्णाने साऱ्यांची समजूत घातली. तो म्हणाला,

"मी जे करतो ते साऱ्यांच्या भल्यासाठीच करतो." मग कृष्ण मथुरेला गेला.

मथुरेच्या वेशीतच कृष्णाचे स्वागत म्हणून एक माजलेला हत्ती सोंडेत माळ घेऊन आला. पण त्याने ती माळ कृष्णाच्या गळ्यात टाकण्याऐवजी आपल्या सोंडेत कृष्णाची मान गुंडाळली. मग चपळाई करून कृष्णाने त्या हत्तीची

सोंड धरून अशी पिरगाळली की, माहुतासह तो हत्ती धाडकन् जमिनीवर पडून मरून गेला. हत्ती मेला. माहूत चिरडून मेला.


ती वार्ता ऐकून कंस म्हणाला, "शाबासऽऽ कृष्णा! तू फारच शक्तिमान आहेस. तू हत्तीशी झुंज घेतलीस, पण मैदानात आमच्या वीराशी कुस्ती करून दाखव."

मग कंसाचे चाणूर आणि मुष्टिक हे दोन वीर कृष्णाशी कुस्ती करू लागले. कृष्णाने एकाच डावात चाणुराचा चेंदामेंदा केला आणि मुष्टिकाला मुठीच्या जबरदस्त ठोशांनी जमिनीवर पाडून रक्त ओकायला लावले. सिंहासनावर बसून कंस म्हणाला, "कृष्णा, तू नंद-यशोदेचा उसना पुत्र आहेस. नंद-यशोदचा आम्हांला काहीच मोठेपणा वाटत नाही. तुझी खरी आई 'देवकी' आणि तुझा खरा पिता 'वसुदेव!' पण वसुदेव कपटी आहे. त्याने तुला जन्मतःच गुपचूप चोरून तुरुंगातून गोकुळात नेऊन ठेवले."

कंसाचे ते बोलणे ऐकून कृष्ण रागाने म्हणाला, "कंसा, राक्षसा, तू मला मारण्यासाठी राक्षस पाठविले होतेस. तू आम्हां गवळ्यांना तुच्छ समजतोस! माझ्या आईवडिलांची निंदा करतोस ! ही गोष्ट मला सहन होत नाही !"

एवढे बोलून कृष्णाने कंसावर एकदम सिंहासारखी झडप घातली. सिंहासनावरून त्याला खाली ओढले आणि त्याच्या छातीवर बसून झटक्यात त्याचा वध केला. कृष्णाने कंसाला ठार मारले.

मग कृष्णाने वसुदेव-देवकी यांना तुरुंगातून सोडविले. कंसाचे वडील उग्रसेन महाराज यांनाही तुरुंगातून सोडवून



सन्मानाने मथुरेच्या राजगादीवर बसविले. तेव्हा सर्वांनी श्रीकृष्णाचा जयजयकार केला.

✱✱

## ९. द्वारकाधीश श्रीकृष्ण

गोकुळातील गोपालकृष्ण आणि बलराम आता मथुरेत राहू लागले. वसुदेव-देवकीला मोठा आनंद झाला. उग्रसेन महाराजांना आपल्या नातवांबद्दल मोठा अभिमान वाटू लागला. ते म्हणाले, " वसुदेवा, रामकृष्णांना आता शिक्षण दिले पाहिजे. तशी व्यवस्था करा."

मग बलराम आणि कृष्ण यांना उज्जयिनीला सांदीपनी

ऋषींच्या आश्रमात शिक्षण घेण्यासाठी ठेवले गेले. तेथे त्यांनी मन लावून अभ्यास केला. गुरूची सेवा केली. आश्रमातील कामे केली. एकदा तर पडत्या पावसात त्यांनी रानावनातून सरपण आणून दिले.

बलराम आणि कृष्ण यांनी सांदीपनींच्या आश्रमात सर्व शास्त्रांचे शिक्षण पूर्ण केले. त्यांची तेथे इतर सोबत्यांबरोबरच सुदामा नावाच्या एका गरीब मित्राशी खूपच चांगली मैत्री झाली. बारा वर्षे शिक्षण पूर्ण झाल्यावर बलराम आणि कृष्ण मथुरेला परत निघाले.

निघताना त्यांनी गुरूला आणि गुरुमातेला नमस्कार केले. तेव्हा गुरुमाता म्हणाली, " तुला पाहिले की, मला माझ्या हरवलेल्या मुलाची आठवण येते. तो आमचा मुलगा पूर्वी यात्रेत हरवला रे !"

शंखासुर नावाच्या राक्षसाने खूप मुले पळवून नेली होती. कृष्णाने नंतर त्या राक्षसाच्या ताब्यातून ती मुले सोडविली. सांदीपनींचा मुलगाही त्यांत होता. तो मुलगा कृष्णाने परत सांदीपनींच्या घरी नेऊन दिला. तेव्हा गुरुमाता म्हणाली, " कृष्णा, धन्य तुझी ही गुरुदक्षिणा!"

कृष्णाने कंसाला ठार मारले या गोष्टीचा कंसाचा सासरा जरासंध, याला भयंकर राग आला. जरासंध हा फार बलिष्ठ आणि क्रूर असा राजा होता. त्याने शंभरावर अधिक क्षत्रिय राजांना आपल्या बंदिखान्यात कोंडले होते.

कृष्ण मथुरेत राहून उग्रसेनाच्या राज्यकारभाराला मदत करीत होता. त्याने आपल्या जावयाला—कंसाला—ठार मारले आणि वसुदेवाच्या यादवकुळाचे महत्त्व खूपच

वाढविले. या गोष्टीचा जरासंधाला संताप आला. त्याने एकदम मथुरेवर हल्ला केला आणि अनेक यादव वीरांना ठार मारले.

जरासंधाच्या त्या मथुरेवरील हल्ल्याचा कृष्णाने खूपच प्रतिकार केला. पण जरासंधाने पुनः पुनः अनेक वेळा मथुरेवर स्वाऱ्या केल्या. त्याच्या त्या स्वाऱ्यांमुळे आपल्या यादव कुळांचा समूळ नाश होऊ नये म्हणून एके दिवशी सारे यादव घेऊन कृष्ण मथुरेतून निघून गेला. त्याने दक्षिणेकडे द्वारका नावाची नवीन नगरी उभारली. यादवांच्या राज्याची ती नवीन राजधानी द्वारका. तेथील राजगादीवर कृष्णाने आपला थोरला भाऊ बलराम याला बसविले.

कृष्ण मथुरेतून पळून गेला म्हणून जरासंधाला आनंद झाला. त्याने मथुरेवरील स्वाऱ्या बंद केल्या आणि आता तो द्वारकेच्या नाशाची तयारी करू लागला. पण यादवांच्या त्या स्वतंत्र राज्यापुढे त्याचे काही चालेना.

द्वारकाधीश श्रीकृष्णाने नंतर रुक्मिणी, जांबुवंती, सत्यभामा, वगैरे आठ स्त्रियांशी लग्ने केली. या लग्नांमुळे अनेक राजांशी यादवांचे जवळचे नाते जोडले गेले. श्रीकृष्ण मोठा चतुर, धोरणी, राजकारणी व शूर पुरुष होता.

★★

## १०. कृष्णसखा सुदामा

एके दिवशी द्वारकेत एक गरीब माणूस आला. फाटके नेसलेला, तटके पांघरलेला, राजवाड्याच्या महाद्वाराशी तो

थांबला. ते वैभव पाहून तो थक्क झाला. भांबावून द्वारपालाला त्याने विचारले, "काय हो, श्रीकृष्णाचा राजवाडा हाच का?"

द्वारपाल म्हणाला, " श्रीकृष्णाचा राजवाडा माहीत नसलेला नवखा असा तू कोण? कोठला?" त्यावर तो गरीब माणूस म्हणाला, "मी सुदामा, श्रीकृष्णाचा सोबती. मी त्याला भेटायला आलो आहे."

"वाहवा ! चांगलीच थाप मारतोस! अरे भिकारड्या तू स्वतःला श्रीकृष्णाचा सोबती म्हणवतोस आणि तुझा हा अवतार ?--चालता हो येथून. श्रीकृष्ण महाराज तुला भेटणार नाहीत!"

द्वारपालाचे हे बोलणे ऐकून श्रीकृष्ण स्वतः तेथे आला. त्याने सुदामाला पाहिले आणि धावत येऊन त्याने त्याला मिठी मारली. कृष्ण म्हणाला, " अरे सुदामा, तू ! आणि आज इथं?" त्यावर सुदामा म्हणाला, "तुझी भेट घ्यायला मोठ्या कष्टाने आलो आहे रे !"

मग कृष्णाने सुदाम्याचा हात धरून त्याला महालात नेले. झोपाळ्यावर बसविले. कृष्ण म्हणाला, "अगं रुक्मिणी, सत्यभामे, बघा, बघा माझा मित्र आला आहे. सांदीपनींच्या आश्रमात आम्ही दोघे एकत्र शिकलो. फार दिवसांनी ही भेट झाली आहे !"

रुक्मिणीने झारीत गरम पाणी आणले. सत्यभामेने सोन्याच्या घंगाळ्यात सुदाम्याचे पाय धुतले. कृष्णाने त्याला दूध दिले. पंख्याने वारा घालताना कृष्ण म्हणाला, " वहिनी कशा आहेत? मुलाबाळांचं काय? आमच्यासाठी भेट म्हणून

तू काय काय आणलं आहेस?" त्यावर सुदामा सुस्कारा सोडून म्हणाला, "बाबारे, गरीबीनं गांजलेला मी, तुझ्यासाठी काय आणणार ! पण तुझ्या वहिनीनं हे मूठभर पोहे दिले आहेत पुरचुंडीत बांधून!"

श्रीकृष्णाने सुदाम्याचे ते मूठभर पोहे घेऊन गपागपा ऽ खाल्ले. थोडे खाली सांडले ते रुक्मिणी-सत्यभामेने वेचून खाल्ले. तेव्हा सुदामा म्हणाला, " अरे, तुम्ही मोठी माणसंऽऽ माझे गरीबाचे ----."

कृष्ण म्हणाला, " हे मूठभर पोहे नाहीत. पोटभर पोहे आहेत मित्रा!"

मग श्रीकृष्णाने सुदाम्याची चार दिवस चंगळच केली. निघताना कृष्ण आपल्याला काहीच देत नाही हे पाहून सुदामा निराश होऊन परत आपल्या गावी गेला. तेथे पाहतो तर काय नवल! श्रीकृष्णाने सुदाम्याची नगरी सोन्याची केलेली दिसली. अगदी दुसरी द्वारकानगरीच! सुदाम्याची बायको म्हणाली,

"खरंच तुमचा कृष्ण - श्रीकृष्ण हा सखा असून आपला गरीबांचा कैवारी आहे. आपली गरीबी हटवली त्यानं!"

**


## ११. पांडवांचा कैवारी

कौरवांनी पांडवांना खूपच त्रास दिला. पांडवांना बारा वर्षे वनवास पत्करावा लागला. दैवगती फिरली. पांडव वनवासात असताना त्यांना भेटण्यासाठी श्रीकृष्ण जायचा

त्यावेळी पांडव म्हणायचे, " कृष्णा, तू आमचा मामेभाऊ- तू आमचा कैवारी. दुष्ट कौरवांकडून आमचे राज्य आम्हांला मिळवून देण्यास तू सहाय्य केले पाहिजेस !"

पांडवांची वनवासाची मुदत संपल्यावर स्वत: श्रीकृष्ण कौरवांकडे गेला तेव्हा दुर्योधन कृष्णाला म्हणाला, "सुईच्या टोकावर मावेल एवढीसुद्धा जमीन पांडवांना आम्ही देणार नाही!" मग कृष्णाला कौरवांचा राग आला.त्याने पांडवांना कौरवांशी युद्ध करण्यास सहाय्य केले.

कौरव-पांडवांचे मोठे युद्ध झाले. कौरवांच्या बाजूला भीष्म, द्रोण, कृपाचार्य वगैरे थोर वीरश्रेष्ठ आणि कृष्णाच्या यादव वंशातील अनेक पराक्रमी योद्धे होते. द्वारकाधीश श्रीकृष्ण पांडवांचा कैवारी होता. तो स्वत: अर्जुनाचा रथ



चालवून युद्धाचे डावपेच सांगून मार्गदर्शन करीत होता.

जेथे कृष्ण आणि अर्जुन तेथे खात्रीने विजय होणार !

पण ऐन युद्धाच्या सुरुवातीला अर्जुनाने हातपाय गाळले. तो म्हणाला, " भीष्म, द्रोणांसारख्या थोर गुरुजनांशी आणि कौरव- भावांशी युद्ध करून मला काय करायचे? मला नको ते राज्य!" मग कृष्णाने त्याला "गीता" उपदेश केला आणि त्याच्याकडून ते युद्ध करवून पांडवांना विजयी केले. कौरवांचा सर्वनाश झाला. पांडवांना त्यांचे राज्य मिळाले. ते सम्राट झाले.

**

## १२. भगवान श्रीकृष्ण

डोळे दिपतील असे दैवी तेज असलेला श्रीकृष्ण असामान्य वैभव प्राप्त झालेला! पण नारदांच्या त्या संदेशामुळे एकदम फिका पडला. अत्यंत अस्वस्थ झाला.

" देवकीचा बाळ मी,यशोदेचा कृष्ण झालो. गोकुळच्या गोपाळांचा मी गडी, स्वतःच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी दामोदर खोडकर कृष्ण बनलो. मथुरेत जाऊन कंसाचा काटा काढला. आणि आपल्या यादव कुळाच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले. नंतर द्वारकेत यादवांचे स्वतंत्र राज्य करून समाजाच्या उपयोगाची कामे केली. पांडवांचा कैवारी होऊन युद्धात दुष्ट कौरवांचा नाश केला. आणि नारद म्हणाले त्याप्रमाणेच आता यादवांमध्ये भांडण सुरू झाले. खरोखर आता पुढे काय होणार!

युद्ध संपल्यानंतर कौरवांची माता गांधारी मला म्हणाली होती की, "कृष्णा, पांडवांचा कैवार घेऊन तू जसा

आमचा कुरुकुळाचा नाश केलास तसाच आपसातील भांडणातून तुझ्या यादवकुळाचाही नाश होईल !" गांधारीचा तो शाप आता मला भोवणार की काय !" अशा विचारांनी कृष्ण बेचैन झाला. आता तो एकदम म्हाताऱ्यासारखा बनला. त्याचे डोके सुन्न झाले. अंग लटपटू लागले. राजकारणात, खाण्यापिण्यात, वागण्यात त्याचे मुळीच लक्ष लागेना. तो द्वारकेतील प्रत्येकाचे निरीक्षण करून पाहू लागला. गोकुळ, मथुरा, इंद्रप्रस्थ वगैरेंचा सारा विचार त्याने दूर सारला.

युद्धातील विजयामुळे कृष्णाच्या बाजूचे सारे यादववीर कौरवांच्या बाजूने नाश पावलेल्या यादवांच्या वंशजांना हिणवू लागले. यादवांच्या गटात खूपच भांडणे सुरू झाली. ती भांडणे मिटविण्याचा कृष्णाने खूप प्रयत्न केला. पण छे! दारू पिऊन मारामाऱ्या करणे, एकमेकांची विटंबना करणे अशा वाईट गोष्टींना ऊतच आला. उघड्या डोळ्यांनी कृष्ण ते सारे पाहात होता; पण--- काय करणार !


एकदा सूर्यग्रहणाच्या पर्वणीनिमित्त सारे सारे यादव स्त्रीपुरुष समुद्रस्नानासाठी जमले होते. बोलता बोलता एकमेकाच्या उखाळ्या-पाखाळ्या काढून ते भांडू लागले. भांडणे विकोपाला गेली. मारामाऱ्या जोरात सुरू झाल्या. त्यात अनेकांचे प्राण गेले. मग कृष्ण रागावला. त्याने समुद्राकाठचे लव्हाळे उपटून त्या मारणाऱ्यांवर फेकले. ते लव्हाळे लोखंडाचे झाले. त्यामुळे अनेकजण मेले. मग जो तो लव्हाळे उपटून फेकू लागला. त्यांच्या कुसळांचे मुसळ बनले. आणि त्याच्या प्रहाराने सारेच यादव त्या ठिकाणी

मरून पडले. तो संहार पाहून कृष्ण बलरामाकडे आला. पण बलरामही मृत्यूपंथाला लागला होता.

तो सारा विनाश पाहून दु:खी मनाने श्रीकृष्ण दूर अरण्यात गेला आणि एका झाडाखाली ध्यानस्थ बसला. शांत मनाने त्यानें समाधी लावली. तेवढ्यात एका शिकाऱ्याचा बाण सूंऽऽसूं ऽऽ करीत आला. तो बाण खस्सकन् कृष्णाच्या तळपायात घुसला. कृष्णाचा जीव कासावीस झाला आणि अखेर तळमळून त्याने प्राण सोडला.

झाले! भगवान श्रीकृष्णाचा अवतार येथे संपला!

भगवान श्रीकृष्णाचे चरित्र हे फार मोठे आहे. दुष्टांचा नाश करण्यासाठी विष्णूने कृष्णरूपाने मानवी अवतार घेतला. गोकुळ, मथुरा, वृंदावन, द्वारका आणि कुरुक्षेत्राची रणभूमी येथे त्याने मानवी प्रेम, कष्ट आणि सुख हे सारे कर्तव्य पूर्ण केले. शेवटी कशातही गुंतून न राहता जगाला ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचा गीता-उपदेश करून या महामानव पुरुषोत्तमाने आपले अवतारकार्य संपविले!



BVBK-0402816